“ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रमुख योजनांचा एक चिकीत्सक अभ्यास”
(कालखंड २००० ते २०१२)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयात विदयावाचस्पती (पिएच.डी.) पदवी नोंदणीसाठी संशोधन प्रारुप सादर.

संशोधक

प्रा. पाटील के. जे.

अर्थशास्त्र विभाग

बिर्ला महाविद्यालय कला, विज्ञान व वाणिज्य (कल्याण)

संशोधन मार्गदर्शक

डॉ. कुंटे ए. पी.

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)

नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर

ता. कळमनुरी, जि. हिंगोली

संशोधन केंन्द्र

सामजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड

जानेवारी २०१५

संशोधन आराखडा

अनुक्रमनिका

अनु.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्र.
१ : १	प्रस्तावना	१
१ : २	अभ्यास विषयाची निवड	४
१ : ३	अभ्यास विषयाचे महत्व	४
१ : ४	संशोधनाची उद्दिष्टे	६
१ : ५	संशोधनाची गृहिते	६
१ : ६	अभ्यास विषयाची व्याप्ती	६
१ : ७	संशोधन पध्दती	७
१ : ८	प्रकरणानुसार प्रबंधाची रचना	८
१ : ९	अभ्यास विषयाची मर्यादा	९
१ : १०	संदर्भग्रंथ सूची	९

“ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रमुख योजनांचा एक चिकीत्सक अभ्यास”
(कालखंड २००० ते २०१२)

१:१ प्रस्तावना :-

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान असून देशाच्या आर्थिक विकासात अगदी पूर्वीपासूनच शेतीचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. अलिकडे करण्यात आलेल्या २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१.०२ कोटी इतकी आहे. या लोकसंख्येपैकी देशाच्या ग्रामीण भागात ६८.८४% आणि शहरी भागात ३१.१६%लोकसंख्या वास्तव्य करते. एकंदरीत तुलनात्मक बाबीचा विचार करता आजही लोकसंखेचा मोठा हिस्सा ग्रामीण भागात राहत असल्याचे स्पष्ट होते.

२०१२-१३ च्या भारतीय आर्थिक सर्वेक्षणानुसार ५८.२% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. यावरून असे स्पष्ट होते की कृषी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्या अनुशंगाने शेती व शेतीपूरक व्यवसायांच्या आर्थिक विकासाला आजही ग्रामीण भागात विविध संधी उपलब्ध आहेत याचा विचार करून आज विविध बॅंका, वित्तीय संस्था, सहकारी क्षेत्राातील बॅंका इ.विविध वित्तीय घटक ग्रामीण शेतकरी, कारागीर व लहान उदयोजक यांना वित्त पूरवठा करताना दिसून येतात.

देशाच्या समतोल उदयोग व क्षेत्रीय विकासासाठी वित्तीयकार्य करावे लागते त्याचप्रमाने आर्थिक विकास कार्यक्रमासाठी जो पैसा लागतो तो पुरविणारा प्रधान स्त्रोत म्हणजे बॅंका होय. ज्या प्रमाणे मानवी शरीरात रक्तवाहिन्यांना रक्ताभिसरणाचेकार्य करावे लागते. त्याप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेत वित्तसंस्था आणि बॅंकांना वित्त संक्रमणाचे कार्य करावे लागते

भारतीय वित्तव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी व्यापारी बँका, परकीय बँका, सहकारी क्षेत्रातील बँका आणि काही असंघटित वित्तीय क्षेत्रातील घटक आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान देतात. परंतू असे जरी असले तरी देशाच्या राज्य आणि जिल्हा पातळीवर विशेषत्वाने ग्रामीण कृषी, कुटिर उदयोग आणि लघुउदयोगांच्या आर्थिक विकासात सहकारी बँकांची भूमिका अनन्यसाधारण अशीच आहे.

सहकारी तत्वावर बँक व्यवसाय प्रथम सुरु करण्याचे श्रेय फ्रेड्रिक विल्यम रायफेसेन व फ्रान्झ हरमन्न शूल्झ यांच्याकडे जाते. सर्वप्रथम जर्मन देशात रायफेसेन पध्दतीच्या सहकारी संस्था व बँका ग्रामीण भागात शेतीसाठी कर्जपुरवठा करण्यासाठी काढण्यांत आल्या.

भारताच्या संदर्भात सहकारी पतपुरवठयाचा उगम १८९५ मध्ये सर फ्रेड्रिक निकोलसन यांच्या सुचनेवरून झाला. त्यानुसार एडवर्ड मॅक्लेगन कमिटीच्या शिफारसीनुसार १९०४ मध्ये सहकारी कायदा संमत करण्यात आला. पुढे याच कायदयाची पुनर्दुरूस्ती करून १९१२ मध्ये केलेल्या सहकारी कायदयानुसार जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनेची शिफारस करण्यात आली. सहकारी बँक व्यवस्था शिस्तबध्द आणि पारदर्शक व्हावी यासाठी पुन्हा एकदा एडवर्ड मॅक्लेगन कमिटीने १९१४ मध्ये केलेल्या सहकारी कायदयानुसार सहकारी बँकांची रचना त्रिस्तरीय असावी असा विचार पूढे आला. त्यानुसार सर्वोच्च पातळीवर राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका दुय्यम स्तरावर असून प्राथमिक कृषी पतसंस्था (चैबे) या तृतीय स्तरावर कार्य करताना दिसून येतात.

प्रत्येक जिल्हा पातळीवर जिल्हयातील प्राथमिक कृषी पतसंस्था आणि राज्य सहकारी बँक यांना जोडणारा दुवा या नात्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा ग्रामीण कृषी विकासात सिंहाचा वाटा आहे.

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना १९५८ मध्ये झाली असून त्यावेळी फक्त ७ शाखा कार्यरत होत्या. वर्तमान स्थितीत बँकेच्या एकूण ९१ शाखा कार्यरत आहेत. अर्थात बँकेचा शाखा विस्तार झपाटयाने होत असलेले चित्र स्पष्ट होते. सदय स्थितीत बँकेचा निव्वळ नफा २९.१० कोटि असून खेळत्या भांडवलाचे एकूण मूल्य ४०८२.६९ कोटी इतके आहे.

महाराष्ट्र राज्यात एकूण ३५ जिल्हे असून ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्वाचा जिल्हा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्हयाची एकूण लोकसंख्या १,१०,०५४१३१ इतकी आहे. जिल्हयातील तालुक्यांची संख्या १५ इतकी असून त्यामध्ये ठाणे, कल्याण,मुरबाड, शहापूर, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ , वसई, डहाणू, पालघर, तलासरी, जव्हार, मोखाडा आणि विक्रमगड इ.तालुक्यांचा समावेश होतो. महाराष्ट्र राज्यात ठाणे जिल्हयाचा औदयोगिकरणाच्या बाबतीत तिसरा क्रमांक लागतो.

ठाणे जिल्हा हे १८४२ आणि २०२० च्या उत्तर अक्षांशाच्या दरम्यान तसेच ७२४५ आणि ७३४८ च्या पूर्व अक्षांशाच्या दरम्यान वसलेले आहे. जिल्हयाची एकूण घनता ११५६कि.मी.^{२}इतकी असून एकूण क्षेत्रफळ ३,५५८ कि.मी.^{२} इतके आहे. ठाणे जिल्हयाच्या पूर्व बाजूला पूणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयांच्या सिमा आहेत आणि दक्षिण बाजूला रायगड जिल्हयाची सिमा आहे.

१:२) अभ्यास विषयाची निवड

सदयस्थितीत ठाणे जिल्हयाच्या ग्रामीण पातळीवर शेतकऱ्यांची तसेच लहान कारागीर यांची विविध कर्जाविषयी योजनांची मागणी वाढत आहे. प्रस्तूत संशोधनातुन ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके मार्फत पुरविल्या गेलेल्या योजना ग्रामीण भागातील लाभार्थ्यांपर्यंत कितपत पोहचल्या? सन २००० पूर्वी व २००० नंतर बँकेच्या कर्जाविषयक धोरणात, प्रगती मध्ये कोणते बदल घडून आले आहेत? तसेच लाभार्थ्यापर्यत विविध योजना पोहचवतांना बँकेला कोणकोणत्या समस्या भेडसावतात. अशा अनेक बाबींचे संशोधन प्रस्तुत संशोधनातुन सुव्यवस्थीतपणे व्हावे या करिता वरिल विषयाची निवड करण्यात आली आहे.

१:३) अभ्यास विषयाचे महत्व -

२०१२-१३ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार भारतात विशेषत: ग्रामीण भागात ६८.८४% लोकसंख्या आणि शहरी भागात ३१.१६% लोकसंख्या वास्तव्य करते, ग्रामीण भागातील लोकसंख्येचा सर्वात मोठा हिस्सा शेती क्षेत्राात विभाजीत झालेला दिसून येतो. तसेच सध्या आजही ग्रमीण भागातील लोकांच्या आर्थिक व कर्ज विषयक गरजा पूर्ण करण्यात सर्वच बँका सक्षम झालेल्या नाहीत. परंतू असे जरी असले तरी विशेष नोंदविण्याजोगे बाब म्हणजे सहकारी बँकांपैकी जिल्हा मध्यवर्ती बँका जिल्हयाच्या ग्रामीण भागातील लोकांच्या कृषी विषयक, वित्त विषयक गरजा पूर्ण करताना दिसून येतात. अर्थात ग्रामीण पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचा विविध प्रकारच्या वित्तीय योजना राबविण्यामध्ये सिंहाचा वाटा आहे.

ठाणे जिल्हयात सदयस्थितीत ‘ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण ९१ शाखा आहेत. जिल्हयाची लोकसंख्या १,१०,५४१३१ इतकी असून लोकसंख्येची घनता ११५७कि.मी.[२] एवढी आहे. सहकारी बँकेच्या त्रिस्तरीय रचनेनुसार ठाणे जिल्हयात ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्य अधिक योग्यपणे सुरू आहे. कारण या बँकेमार्फत ठाणे जिल्हयातील लोकांकरीता त्यांचा आर्थिक स्तर, उंचावण्याकरीता तसेच राहणीमानाचा दर्जा उंचावण्याकरिता ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत जसे की स्वयंसहायता गट,शेती कर्ज योजना, बिगर शेती योजना, वाहण कर्ज योजना, पगार तारण कर्ज योजना, नविन घर खरेदी, नविन घर बांधनीगाळा खरेदी, यांसारख्या योजना राबविल्या जात आहेत.

प्रस्तुत संशोधन करीत असतनाना ठाणे जिल्हयामध्ये ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत लोकांनं नेमकया कोणत्या सुविधा पुरवील्या जात आहेत? तसेच या सुविधा घेतलेल्या लाभार्थ्यांच्या उत्पन्नामध्ये काय फरक पडत आहे ? तसेच या लाभार्थ्यांना त्यांच्या दारिद्रयतेनुसार बँकेमार्फत काही सवलती दिल्या जात आहेत का ? तसेच किती लोकांनी या बँकेमध्ये खाती उघडलेली आहेत? व किती लोकांनी खाती उघडलेली नाहीत ? इ. विषयाची माहिती संकलीत केली जाणार आहे.

या संशोधनातून जे लाभार्थी बँकेच्या योजनेपासून वंचीत आहेत. अशा लोकांना या बँकेच्या योजनांबाबत माहिती उपलब्ध करुन देणे हा मुख्य उद्‌देश आहे व तसचे लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी, निर्माण होणाऱ्या समस्या याविषयीचे देखील संशोधन केले जाणार असून त्यावर उपाय सुचविणे हे देखील मुख्य उद्‌दिष्ट या संशोधनाचे आहे.

१:४) संशोधनाची उद्दिष्टे-

१. सन २०००च्यानंतर बँकेच्या योजनेत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

२. सन २००० नंतर बँकेच्या प्रगतीचा आढावा घेणे.

३. विविध योजनांमधून बँकेला प्राप्त झालेल्या ठेवींचा अभ्यास करणे.

४. बँकेने विविध योजनेला दिलेल्या कर्जाचा अभ्यास करणे.

५. बँकेसमोर निर्माण झालेल्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.

६. बँकेच्या विविध समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

१.५) अभ्यास विषयाची गृहिते :-

१. सन २००० च्यानंतर ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या योजनांच्या संख्येत बदल झालेला आहे.

२. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ठेवीदारांच्या (लाभार्थ्यांच्या) संख्येमध्ये फरक दिसून येत आहे.

३. योजना राबविण्याकरीता ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला विविध समस्यांना तोंड दयावे लागत आहे.

१:६) अभ्यास विषयाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन प्रकल्पात ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कार्यक्षेत्रा अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच प्रस्तूत संशोधन हे केवल ठाणे जिल्हया पूरतेच मर्यादित राहणार आहे. तसेच हे संशोधन केवळ याच बँकेमार्फत लाभ घेणाऱ्या लाभार्त्याच्या पुरतेच मर्यादित राहणार आहे.

१.७) संशोधन पध्दती :-

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेली संशोधन पध्दती व माहिती संकलनाचेस्त्रोत यासंबंधी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

प्राथमिक सामग्री :-

प्रस्तुत अध्ययन करताना ठाणे जिल्हयातील ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील योजनांचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांकडून माहिती संकलीत केली जाणार आहे. नमुना निवडीच्या ज्या विविध पध्दती आहेत त्यातील सोईस्कर किंवा सुविधाजनक नमुना निवड पध्दतीचा वापर केला जाणार आहे. तसेच लाभार्थ्यांच्या मुलाखतींव्दारे माहिती संकलीत केली जाणार आहे.

संशोधनासाठीची उपयुक्त माहिती प्रश्नावली पध्दतीच्या आधारे या बॅंकेतील योजनांचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांकडून प्रत्यक्ष भेटी घेऊन प्रश्नावली भरुन उपयुक्त माहिती गोळा केली जाईल.

ठाणे जिल्हयात पूर्वी पंधरी तालुके समाविष्ट होते परंतु सदय स्थितीत जिल्हयाचे विभाजन झालेले असून ठाणे जिल्हा व पालघर जिल्हा असे दोन स्वतंत्र जिल्हे अस्तित्वात आलेले आहेत तेव्हा वर्तमान स्थितीत ठाणे जिल्हयात ठाणे, भिवंडी, कल्याण, मुरबाड, अंबरनाथ, उल्हासनगर, शाहपूर असे ७ तालुके समाविष्ट आहेत.

सदर जिल्हयातील सर्व तालुक्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या एकूण ५० शाखा नमुना म्हणून संशोधनाच्या अभ्यासासाठी सुव्यवस्थितपणे अभ्यासल्या जाणार आहेत. नमुना म्हणून प्रत्येक शाखेतील ७ लाभार्थ्यांकडून माहिती गोळा केली जाणार आहे. त्यामध्ये २०० ग्रामीण आणि १५० नागरी भागातील लाभार्थ्यांकडून नमुना म्हणून माहिती गोळा केली जाणार आहे.

दुय्यम सामग्री : संशोधनासाठी आवश्यक असलेली दुय्यम सामुग्री संकलीत करण्यासाठी शोध निबंध, मासिके, विशेषांक, संदर्भ ग्रंथ, बॅंकेची ताळेबंद पत्रक, परिपत्रके तसेच केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या योजनेच्या मार्गदर्शनाचे अहवाल, भारतीय सांख्यिकी अहवाल इ. द्वारे प्रस्तूत अभ्यासासाठी लागणारी दुय्यम सामग्री संकलीत केली जाणार आहे.

१.८) प्रकरणानुसार प्रबंधाची रचना :

प्रस्तूत संशोधन प्रकल्पाची सात प्रकरणांमध्ये विभागणी करण्यात येणार आहे. पहिले प्रकरण हे प्रास्ताविक असून यामध्ये ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा इतिहास व त्या बँकेची कार्यप्रणाली या बाबत सर्व साधारण माहिती सादर केली जाणार आहे.

दुसरे प्रकरण हे संशोधन पध्दती असून या प्रकरणात संशोधनाचे महत्व, विषयाची निवड, संशोधनाची उदिद्ष्टे, गृहित कृत्य, संशोधन संदर्भ साहित्याचा आढावा तसेच अभ्यासाची व्याप्ती व संदर्भ विचारात घेतले जातील.

तिसरे प्रकरण हे ठाणे शहराची ओळख किंवा ठाणे जिल्हयाचा इतिहास असून या प्रकरणात ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रगतीचा आढावा व त्यात होणा-या बदलाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे हे ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत राबविलेल्या योजनांची माहिती व तसेच लाभार्थ्यांच्या उत्पन्नाचा, राहणीमानाचा स्तर यातील बदलांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे हे लाभार्थी कुटुंबांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषण असून त्यात त्यांच्या आर्थिक परिस्थितीत होणाऱ्या बदलांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सहावे हे ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत पुरविलेल्या योजना असून त्या पुरवीतांना लाभार्थ्यांना येणाऱ्या समस्यांचा यात अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सातवे हे निष्कर्ष व शिफारसी असून या मध्ये योजना अधिक सक्षमपणे चालविण्याकरीता व लाभार्थ्यांना अधिक चांगल्या पध्दतीने लाभ घेण्याकरीता उपाय सुचविले जाणार आहेत.

१.९) अभ्यास विषयाच्या मर्यादा :-

प्रस्तूत संशोधन प्रकल्प हा ठाणे जिल्हयातील ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विविध शांखापुरते मर्यादित राहणार आहे.

१.१०) संदर्भग्रंथ सूची :-

१. दासगुप्ता आर, मायक्रोफायनान्स इन इंडिया, २००५.

२. भादुरी. ऐ., 'प्रोव्हीजन ऑफ रुरल फिनान्शीयल सर्व्हिसेस ऑक्सफर्ड युनिव्हसिटीज.

३. गुलाटी अशोक अॅड सिमा बथला, इन्स्टिटयुशनल क्रेडिट टू इंडियन अॅग्रीकल्चर, ओकेशनल पेपर - २३, मुंबई.

४. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, रिपोर्ट ऑफ द टास्क फोर्स ऑन रिव्हायवल ऑफ को-ऑपरेटिव्ह, क्रेडिट-इन्स्टिटयुशन, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स.

५. एल. एम. भोले, जितेंद्र महाकुड, फिनांशियल इन्स्टियुशन अॅड मार्केड, मॅकग्रा-हिल पब्लिकेशन, न्यु दिल्ली २००९.

६. माधव दातार, 'सहकारी बँकासमोरील अव्हाने, अर्थबोध, पुणे, टव्ह.०५ण

७. रेडिड् वाय.वी.,एन.पी.ऐ. अॅड को-ऑपरेटिव्ह बँक,सेंटर फॉर इकोनॉमिक अँड सोशल स्टडिज, हैद्राबाद २००८.

८. रुद्र दत्त अँड के.पी.एम. सुंदरम्, इंडियन इकोनॉमी, एस. चांद पब्लिकेशन, २०११.

९. रंजन कोळंबे, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन पूणे, २०१०-११.

१०. श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे 'वित्तीय संस्था आणि वित्तिय बाजार, हिमालया पब्लिकेशन, २००४.

११. शरद गीत, बँकिंगची मुलतत्वे व व्यवहार, सेठ पब्लिकेशन- १९९९.

१२. सुब्रमन्यम बी. को-ऑपरिटीव्ह क्रेडिट स्ट्रक्चर अ पर्सपेक्टिव्ह फॉर २०००इन पोझिशनिंग को-ऑपरेटिव्ह इन २१ज सेंच्यूरी, १९९९

१३. वसंत देसाई, भारतीय वित्त व्यवस्था, थ्रिटियर स्ट्रकचर ऑफ को. ऑपरेटिव्ह बॅक, १९९९.

१४. झा.यु.एम अॅड नरेश, 'इकॉर्नॉमिकस ऑफ रुरल डेव्हलपमेंट,' इन्स्टिटयुशनल जर्नल ऑफ रुरल स्टडी'.

प्रा. पाटील के. जे.
संशोधक

डॉ. कुंटे ए. पी.
संशोधन मार्गदर्शक
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
नारायणराव वाघमारे महाविद्यालय,
आखाडा बाळापूर ता. कळमनुरी,
जि. हिंगोली